**दिनांक १८-०४-२०१२ रोजी वनसभागृह नागपूर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजनेच्या सभेचा कार्यवृत्तांत**

महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक १८-०४-२०१२ रोजी अध्यक्ष, व्यवस्थापन समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीत खालील व्यवस्थापन समिती सदस्य/नामनिर्देशित सदस्य/केंद्रस्थ अधिकारी उपस्थीत होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री ए.के. जोशी | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर -अध्यक्ष |
| २ | श्री सर्जन भगत | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा. नागपूर - सदस्य |
| ३ | श्री एस.जी. टेंभूर्णीकर | मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) नागपूर - सदस्य सचिव |
| ४ | श्री एम.एन. गवळी | मुख्य वनसंरक्षक (दक्षता व कर्मचारी कल्याण), नागपूर - कोषाध्यक्ष, कार्यकारी समिती |

व्यवस्थापन समितीवर नामनिर्देशित सदस्य

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | आर.एस. दावलवार | विभागीय वन अधिकारी (तेंदू) | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. ए. यु. पाटील | सहाय्यक वनसंरक्षक | धुळे वनवृत्त |
| ३ | श्री. जे.एस. आगलावे | कार्यालय अधिक्षक | पुणे वनवृत्त |
| ४ | श्री. व्ही.बी. गोसावी | मुख्य लेखापाल | नाशिक वनवृत्त |
| ५ | श्री. बी. आर. अटकापुरवार | लिपीक | गडचिरोली वनवृत्त |
| ६ | श्री. एस. बी. नागरे | वनरक्षक | अमरावती वनवृत्त |
| ७ | श्री. एस. जी. धोटे | शिपाई | नागपूर वनवृत्त |

नाम निर्देशित केंद्रस्थ अधिकारी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री एस.व्ही. अल्लुरवार | विभागीय वन अधिकारी (योजना) | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. व्ही. व्ही. पाटोळे | विभागीय वन अधिकारी (योजना) | यवतमाळ वनवृत्त |
| ३ | श्री व्ही. एन. हिंगे | विभागीय वन अधिकारी (योजना) | नाशिक वनवृत्त |
| ४ | श्री. डी.जी. वळसे | विभागीय वन अधिकारी (योजना) | औरंगाबाद वनवृत्त |
| ५ | श्री. पी.जी. राहुरकर | विभागीय वन अधिकारी (योजना) | धुळे वनवृत्त |
| ६ | श्री. बी. एच. पाटील | विभागीय वन अधिकारी (योजना) | गडचिरोली वनवृत्त |
| ७ | श्री. डी. बी. घुडे | विभागीय वन अधिकारी (योजना) | अमरावती वनवृत्त |
| ८ | श्री. एस. बी. वळवी | विभागीय वन अधिकारी (योजना) | ठाणे वनवृत्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री. एस. डी. डोडल | विभागीय वन अधिकारी (योजना) | चंद्रपूर वनवृत्त |
| १० | श्री. बी. डी. देशाने | विभागीय वन अधिकारी | ----------- वनवृत्त |
| ११ | श्री एम. एम. वाणी | मुख्य लेखापाल | धुळे वनवृत्त |

२.०० सर्वप्रथम अध्यक्षांनी सदर बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांचे परवानगीने पदसिध्द सदस्य सचिव यांनी दिनांक ०४/०६/२०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत तसेच योजने बाबत माहिती विषद केली.

३.०० सदस्य सचिव यांनी बैठकीत उपस्थितांना सन २०११-१२ मध्ये एकुण ११९३० सभासद झाले बाबत माहिती दिली तसेच सदर योजना कार्यान्वयीत झाल्यापासून मृत सभासदांचे कुटुंबियांना तसेच सभासदांचे पाल्यांना देण्यात येणा-या व दिलेल्या फायदयांबाबत माहिती विषद केली.

**अपघाती प्रकरणी विमेचा लाभ**

अ) महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजना स्थापित झाल्यापासून आजपावेतो अपघाती मृत्यू प्रकरणी एकुण २९ मृत सभासदांचे कुटूंबियांना विमा रक्कम रुपये १.१५ कोटी अदा करण्यात आली आहे. तसेच ३ मृत सभासदाचा विमा दावा विमा कंपनी स्तरावर तर २ मृत सभासदांचे विमा दावे विभागीय समिती स्तरावर प्रलंबित आहेत.

ब) गट-क व गट-ड संवर्गातील कार्यरत सभासदांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबियाना विमा रक्कम पुरविण्यात येते, तसेच रक्कम पुरविण्यास काही कालावधी लागत असेल तर त्यांचे कुटूंबियांना रुपये २०,०००/- मदत म्हणून आगाऊ रक्कम विभागीय समिती स्तरावर तात्काळ अदा करण्यात येते. योजना सुरू झाले पासून आजपावेतो अपघाती मृत्यू झालेल्या ०३ मृत सभासदाच्या कुटुंबियांना याचा लाभ देण्यात आला असून एकुण रूपये ६०,०००/- अदा करण्यात आले आहे.

**अपघाती प्रकरणी विमेचा अभावी/नैसर्गिक मृत्युमुळे प्रदान केलेल्या आर्थिक सहाय्य**

क) गट-क व गट-ड या संवर्गातील कार्यरत सभासदांचा अपघाती/नैसर्गिक कारणास्तव मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबियांना आर्थिक सहाय्य त्वरीत विभागीय समिती स्तरावर अदा करण्यात येते. योजना सुरू झाले पासून आजपावेतो अपघाती/नैसर्गिकरित्या ८५ मृत सभासदांच्या कुटुंबियांना याचा लाभ देण्यात आला असुन एकुण रुपये १६.१० लक्ष अदा करण्यात आली आहे.

ड) **पुस्तकीय अनुदान**

गट `क` व गट `ड` संवर्गातील सभासदांचे पाल्यांना इयत्ता ८ वी पासुन ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास खालील प्रमाणे पुस्तकीय अनुदान देण्यात येते. तथापी कोणत्याही विभागीय समिती कडून या बाबत प्रस्ताव मंजूर केल्याबाबत या कार्यालयास कळविण्यात आले नाही.

इ) **वैद्यकीय कर्ज**

सभासदांचे तसेच त्यांचे कुंटुंबियांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुपये १०,०००/- चे मर्यादेपर्यंत ९ महिन्यांचे कालावधीकरीता बिनव्याजी कर्ज देण्यात येते. कर्जाची वसूली ९ महिन्यांचे आत न झाल्यास १०% या दराने व्याजाची वसूली करण्यात येते. सदर बाबतीत शासन निर्णय क्रमांक एफएसटी ०२/०८/प्र.क्र.१०३/फ-४, दिनांक ०२/०८/२०११ अन्वये शासनाने मंजूरी दिलेली आहे. सभासदांचे तसेच त्यांचे कुटुंबियांचे वैद्यकीय उपचाराकरिता आजतागायत वैद्यकीय कर्ज अदा करण्यात आलेले नाही.

फ) **पारीतोषिक देणेबाबत :-**

गट-क व गट-ड संवर्गातील सभासद कर्मचा-याचे पाल्यांना १० वी व १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये २०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- पारितोषिक स्वरुपात देऊन त्यांचा विभागीय समिती स्तरावर सत्कार करण्यात येतो. सदर योजनेच्या अनुषंगाने अद्याप १८ सभासदांच्या पाल्यांना पारितोषिक देण्यात आले आहे.

ग) **गट क व गट ड मधील सदस्य कर्मचा-यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देणे बाबत-**

गट क व गट ड संवर्गातील ज्या सभासद कर्मचा-यांचा अचानक मृत्यु झाला व त्यांचे कुटुंबाचे निवृत्ती वेतन रुपये ५०००/- प्रतीमाह पेक्षा जास्त नाही अशा सभासदाचे फक्त २ अपत्यासाठी प्रत्येकी रुपये २००/- प्रतीमाह याप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. अद्याप १ मृत सभासदाचे पाल्यास सन २०१०-११ व २०११-१२ या वर्षाकरीता रूपये २००/- प्रतिमाह या दराने रूपये ४०००/- अदा करण्यात आले आहे.

४.०० सदर बैठकीमध्ये नव्याने आलेले खालील विषयावर चर्चा करण्यात आली .

| विषय क्रमांक | संक्षिप्त विषय | झालेली चर्चा व त्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४ (अ) | सन २०१२-१३ वर्षाकरीता विमा कंपनीची निवड करणे | सदस्य सचिव यांनी सन २०१२-१३ या वर्षाकरिता (१/८/२०१२ ते ३१/७/२०१३) वनकल्याण निधीचे सभासदांचा विमा काढावयाचा असल्याने खालील ४ विमा | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | बाबत | कंपनीकडून दरपत्रक प्राप्त मागविण्यात आले असले बाबत माहिती विषद केली.<br><br>१) दि. ओरीएंन्टल इन्श्योरेंस कंपनी लि., माऊंट रोड, सदर, नागपूर.<br>२) न्यु इंडिया इन्श्योरेंस कंपनी लि., वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर.<br>३) नॅशनल इन्श्योरेंस कंपनी लि., माऊंट रोड, सदर, नागपूर.<br>४) एस.बी.आय. जनरल इन्श्योरेंस कंपनी लि., नेहरूरोड, पुणे.<br><br>वरील चारही विमा कंपनींच्या दरपत्रकांवर चर्चा करण्यात आली व १०००० ते १५००० सभासदाकरिता रुपये ४.०० लक्ष विमा उतरविण्याकरिता प्रत्येकी न्यु इंडिया इन्श्योरेंस कंपनी लि., वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर. यांचा प्रति सभासद रुपये ३९७.०८ असल्याने व सदर दर इतर विमा कंपनीपेक्षा कमी असल्याने तथापी त्यांनी १०००० सभासदांकरीता एकुण रक्कम ३९,७०,८००/- तसेच १५००० सभासदांकरीता एकुण रक्कम ५९,५६,२००/- दरपत्रकात सदर रक्कम देय ठरत असल्याचे नमूद केली असल्याने अध्यक्षांनी असे सूचविले की, जर सन २०१२-१३ या वर्षाकरीता १०००० ते १५००० सभासद झाले तर त्यांचा विमा दि. ओरीएंन्टल इन्श्योरेंस कंपनी लि., माऊंट रोड, सदर, नागपूर यांचेकडे रूपये ३९८/- प्रती सभासद या दराने काढणे सोईचे राहील कारण जेवढे सभासद संख्या असेल तेवढीच विमा रक्कम देय ठरेल व जर १५००० पेक्षा जास्त सभासद झालेत तर त्यांचा विमा नॅशनल इन्श्योरेंस कंपनी लि., माऊंट रोड, सदर, नागपूर यांचेकडे रूपये २९७.८१/- या दराने काढणे उचीत राहील. सदर वसूली ही माहे मे २०१२ मध्ये | |

| | | | |
|---|---|---|---|
| - | | देय होणा-या माहे एप्रिल २०१२ च्या वेतनातून करण्यात यावी. यावर व्यवस्थापन समितीने मान्यता प्रदान केली. | |
| ४(ब) | सन २०१२-१३ या वर्षासाठी सभासदांकडून स्विकारायचे वर्गणी व विमा शुल्क निश्चित करणे. | सभासदाकडून सन २०११-१२ वर्षाकरीता सभासद शुल्क + विमा शुल्क रुपये ३६१/- प्रति सभासद इतकी घेण्यात आली आहे. तथापी विमा कंपनींकडून सन २०१२-१३ या वर्षाकरीता मागविण्यात आलेले दरपत्रकांनुसार विमा कंपनींव्दारे दिलेले विम्याचे दर फारच जास्त असल्यामुळे (विमा शुल्क अंदाजे रूपये ३९८/-) सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता सभासदांकडून विमा शुल्क अंदाजे रूपये ३९८/- व सभासद शुल्क रू. १०२/- असे एकुण रूपये ५००/- घेणेबाबत प्रस्तावीत करण्यात आले. सदर वसूली ही माहे मे २०१२ मध्ये देय होणा-या माहे एप्रिल २०१२ च्या वेतनातून करण्यात यावी असे मत सदस्य सचिव यांनी व्यक्त केले. त्यास व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ४(क) | युनायटेड इंडिया इन्श्योरेंस कंपनीने दिनांक ३/३/२०१२ रोजी करार एकतर्फी संपुष्टात आणल्यामुळे सन २०११-१२ या वर्षातील उर्वरीत कालावधी साठी विमा कंपनीची निवड करणे | युनायटेड इंडिया इन्श्योरेंस कंपनी लि., डिव्हीजनल कार्यालय क्रमांक २, शंकरनगर चौक, नागपूर यांचेकडे सन २०११-१२ या वर्षाकरीता रूपये १३७/- प्रती सभासद या दराने एकुण ११९३० सभासदांचा सामुहीक अपघात विमा एकूण रू.१६,३४,४१०/- (एकूण रू. सोळा लक्ष चौतीस हजार चारशे दहा फक्त) अदा करून काढण्यात आला होता. तथापी सदर कंपनीकडे वन विभागाकडून एकुण ९ विमा दावे सादर केल्यामुळे सदर विमा कंपनीस होणारा तोटा हा २००% पेक्षा जास्त होणार असल्याने सदर कंपनीने त्यांचेकडील पत्र क्रमांक २३०२००/जीपीए/२०११/३९५, दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये कळवून विमा पॉलीसी दिनांक ०३/०३/२०१२ पासून रद्द केली असल्याने व प्र.मु.व.सं. | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यालयाकडुन संबंधीत विमा कंपनी विरुध्द कायदेशीर कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने खालील ३ विमा कंपनींकडून सभासदांचा दिनांक १७/०४/२०१२ ते ३१/०७/२०१२ या कालावधीकरीता विमा काढणे करीता प्राप्त झालेले दरपत्रक व्यवस्थापन समितीसमोर मंजूरी करीता ठेवले.<br><br>१) दि. ओरीएंन्टल इन्श्योरेंस कंपनी लि., माऊंट रोड, सदर, नागपूर.<br>२) न्यु इंडिया एश्योरेंस कंपनी लि., वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर.<br>३) युनायटेड इंडिया इन्श्योरेंस कंपनी लि., शंकरनगर चौक, नागपूर.<br><br>वरील ३ विमा कंपनीपैकी दि. ओरीएन्टल इन्शोरेंस कंपनी लि., सदर, नागपूर यांचे दर प्रति सभासद रूपये ११३/- हे इतर २ विमा कंपनींच्या तुलनेत कमी असल्याने सदर कंपनीचे दरपत्रकास व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | |
| ५(अ) | महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीचे फायदे गट-क व गट-ड संवर्गातील सभासदांप्रमाणे गट-अ व गट-ब मधील सभासद अधिका-यांना सुध्दा देणेबाबत | महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीचे फायदे गट-क व गट-ड संवर्गातील सभासदांप्रमाणे गट-अ व गट-ब मधील सभासद अधिका-यांना सुध्दा देणे संबंधाने खालील मुद्या क्रमांक १ ते ५ वर सविस्तर चर्चा करण्यात आली.<br>i) सभासदाचा नैसर्गिक/अपघाती मृत्यु झाल्यास आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत.<br>ii) सभासदांचे पाल्यांना इयत्ता ८ वी पासुन पुढील शिक्षण पूर्ण करण्यास्तव ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास पुस्तकीय अनुदान देणेबाबत. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (iii) सभासदांचे तसेच त्यांचे कुंटुंबियांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुपये १०,०००/- चे मर्यादेपर्यंत बिनव्याजी वैद्यकीय कर्ज मंजूर करणेबाबत.<br><br>(iv) सभासद/ कर्मचा-यांचा अचानक मृत्यु झाला असेल व त्यांचे कुटुंबाचे निवृत्ती वेतन रुपये ५०००/- प्रतीमाह पेक्षा जास्त नाही अशा सभासदाचे फक्त २ अपत्यासाठी प्रत्येकी रुपये २००/- प्रतीमाह याप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत.<br><br>(v) **<u>पारितोषीक देणेबाबत</u>**. ज्या सभासद कर्मचा-याचे पाल्यांना १० वी / १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये २०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- पारितोषिक स्वरुपात देवून त्यांचा सत्कार विभागीय समिती स्तरावर करणेबाबत.<br><br>उपरोक्त नमूद (i) ते (v) बाबींवर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत अध्यक्षांनी खालील प्रमाणे सूचविले<br><br>i) **<u>आर्थिक सहाय्य देणे</u>**. गट `अ` ते गट `ड` मधील सभासदांचा नैसर्गिक/अपघाती मृत्यु झाल्यास त्यांचे कुटुंबियांना आर्थिक सहाय्य रुपये २५,००० अदा करण्यात यावे.<br><br>ii) **<u>पारितोषीक देणेबाबत</u>**. गट `अ` व गट `ब` मधील सभासदांचे पाल्यांना १० वी / १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना प्रशस्ती पत्र देवून त्यांचा सत्कार विभागीय समिती स्तरावर करण्यात यावा. तसेच गट `क` व गट `ड` मधील सभासदांचे पाल्यांना १० वी / १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये २०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- पारितोषिक स्वरुपात तसेच प्रशस्ती पत्र देवून त्यांचा सत्कार विभागीय समिती स्तरावर करण्यात यावा. यावर व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | |
| ५(ब) | विमा राशीत वाढ करणे | सद्य:स्थितीत विमा राशी रू.४.०० लक्ष करीता इन्शुरेन्स कंपनीने विमा प्रिमीयम राशी वाढवली असल्याने विमा रक्कमेत वाढ केल्यास पर्यायाने विमा प्रिमीयम राशीत अजून वाढ होईल त्यामुळे सदर योजनेतील सभासद संख्या कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सन २०१२-१३ या वर्षासाठी विमा राशी रू.४.०० लक्ष ठेवण्यात यावे असे सर्वानुमते व्यवस्थापन समितीचे बैठकीत ठरले. | कार्यकारी समिती |
| ५(क) | महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजना वन व सामाजिक वनीकरण विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचा-यांना अनिवार्य करणे | शासन निर्णयान्वये सदर योजना ही ऐच्छिक स्वरूपाची ठेवलेली आहे त्यामुळे त्यात बदल करणे व्यवहारीक होणार नाही. परंतु सदर योजनेची वैशिष्टे सर्व संबंधीताचे निदर्शणास आणणे बाबत व जास्तीत जास्त सभासद होणे संबंधाने त्यांचेस्तरावर जरुर ती कार्यवाही करणे बाबत उपस्थितांना अवगत करण्यात आले. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ५(ड) | ज्या सभासदांचा अपघाती मृत्यू झाला परंतु विमाअभावी त्यांचे कुटुंबियांना | सदस्य सचिवांनी सभेत नंदूरबार वनविभागाने सन २०१०-११ मध्ये सभासदांची वर्गणीसंबधी रूपये ९०,०००/- चा धनाकर्ष सादर केला. परंतु सदर सभासदांची यादी या कार्यालयास सादर केली नसल्याने नंदुरबार वनविभागातील सभासदांचा सन २०१०-११ या वर्षाकरीता | कार्यकारी समिती / विभागीय समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | विमा राशी मिळू शकली नाही अश्या सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य मंजूर करणे | विमा काढता आला नाही. ही चुक सभासदांची नसल्याने व्यवस्थापन समितीने अपघाती मृत्यू झालेल्या खालील ३ सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून प्रत्येकी रुपये ४.०० लक्ष आर्थिक सहाय्य देणे बाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे मंजूरीस्तव सादर केला. त्यावर व्यवस्थापन समितीने मंजूरी दिली परंतु संबंधीत वृत्ताकडून प्रकरणाची सविस्तर तपासणी करुन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधीतांचे कुटूंबियांना रुपये ४.०० लक्ष मंजूर करण्यात येईल असे व्यवस्थापन समितीचे बैठकीत ठरले.<br><br>i) स्व.संभाजी राजाराम पाटील, लिपीक<br>ii) स्व.सुभाष गजमल पवार, वनरक्षक<br>iii) स्व.भारती दिलीप जगदेव, वनरक्षक<br>iv) तसेच उपवनसंरक्षक, धुळे यांचे कार्यालयातील श्री. नितीन लोटन कापडे, वाहन चालक यांचेकरिता मोटार वाहन ॲक्ट नुसार त्यांना लाभ मिळतो किंवा कसे याबाबतची तपासणी करणे बाबत संबंधीतांना बैठकीत सांगण्यात आले व धुळे वनवृत्ताचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्व. श्री. कापडे यांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य रक्कम रूपये ४.०० लक्ष अदा करणेबाबत कार्यवाही करता येईल असे व्यवस्थापन समितीचे बैठकीत ठरले. | |
| ५(इ) | वन कल्याण निधी योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता सदर योजनेची जाहिरात करणे. | सभेत उपस्थित सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, वनकल्याण निधी योजनेच्या विविध फायदयांबाबत अतिदुर्गम भागातील कर्मचा-यांना माहिती नसल्याने सभासद संख्येत वाढ करण्याच्या दृष्टिने सर्व अध्यक्ष, विभागीय समिती यांनी त्यांचे अधिनस्थ वनविभाग व वनपरिक्षेत्रात महिन्यातून एकदा बैठक घेवून वनकल्याण निधीच्या | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | फायदयांबाबत कर्मचा-यांना अवगत करण्यात यावे. दुर्गम भागात श्राव्य माध्यम (रेडियो) व्दारे सदर योजनेची जाहीरात करणे अंत्यत आवश्यक असून रेडियोव्दारे जाहीरात करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे मंजूरीस ठेवण्यात आला व सदर प्रस्तावास अध्यक्षांनी यास मंजूरी प्रदान केली | |
| ५(फ) | वनकल्याण निधी योजने संबंधी माहिती वेबसाईट वर प्रसिध्द करणेबाबत | उपस्थित सदस्यांनी असे मत व्यक्त केले की वनकल्याण निधी योजने संबंधी माहिती जास्तीत जास्त कर्मचा-यांना असावी या करीता या बाबतची माहिती वेबसाईट वर उपलब्ध करण्यात यावी. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ५(ग) | वनकल्याण निधीच्या रक्कमेची फ्लेक्झी अकाउंट मध्ये गुंतवणूक करणेबाबत | उपस्थित सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, सध्या वनकल्याण निधीची रक्कम मुदत ठेव योजनेत ठेवण्यात आली असल्याने त्यावर कमी व्याज दर मिळत आहे. सदर रक्कम फ्लेक्झी योजनेत ठेवण्यात आल्यास त्यावर अधिक व्याजदर मिळेल, तरी सदर रक्कम फ्लेक्झी योजनेत ठेवण्यात यावी, यावर अध्यक्षांनी मंजूरी प्रदान केली. | कार्यकारी समिती |

सभेअंती सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

२८/५

अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी
तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर